# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

## ४१२, ई शिवाजीनगर पुणे - ४११ ०१६

२५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ **E-Mail** – ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्रं.विकापु/आस्था-१/सावेआ/२०१९/ 4161 दिनांक : 05 OCT 2019

प्रति,

प्राचार्य/संस्थाप्रमुख
सर्व शासकीय /अशासकीय अनुदानित पदविका संस्था

**विषय** - राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थेतील शिक्षकीय पदांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार सातवा वेतन आयोग लागू करुन वेतननिश्चिती करण्याबाबतच्या कार्यवाहीबाबत...

संदर्भ:- १.उच्च व तंत्रशिक्षण विभाग शानिक्र.सावेआ-१११११/प्र.क्र.४४/१९/तांशि-२ दि.११/०९/२०१९
२.मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.५(३)/आस्था/७ वेआ/२०१९ ३२४ दिनांक २५/०९/२०१९
३.या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०१९/४०४६ दिनांक २७/०९/२०१९

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये, राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत शासकीय/अशासकीय अनुदानित पदविका संस्थेतील शिक्षकीय पदांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार सातवा वेतन आयोग लागू झालेला आहे. तदनुषंगाने संदर्भ क्र.३ अन्वये, या कार्यालयांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित पदविका संस्थांनी केलेली अध्यापकांची सातव्या वेतन आयोगातील वेतननिश्चिती ही अचुक व शासन निर्णयातील मुददे/तरतूदीनुसार केलेली असल्याबाबत पडताळणी करुन त्यानुसार वेतननिश्चिती प्रपत्र या कार्यालयामार्फत प्रामाणित करणेबाबत आदेशित केलेले आहे.

त्यास अनुसरुन आपल्या आस्थापनेवरील कार्यरत अध्यापकांची ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणीमध्ये दि.०१/०१/२०१६ ची वेतननिश्चिती करणे , विकल्प भरुन घेणे व हमीपत्र/ वचनपत्र भरुन घेण्याची कार्यवाही संस्थास्तरावर पुर्ण करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

तदनंषुगाने खालील नमूद संस्थांनी त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या दिनांकास वेतननिश्चितीची प्रपत्रे, विकल्प,हमीपत्र,संबंधितांचे मूळ सेवापुस्तक तसेच आवश्यक त्या सर्व शासन निर्णयासहित या कार्यालयांत उपस्थित रहावे.

(कृ.मा.प)

## पदविका संस्था

| अ.क्र. | संस्थेचे नांव | दिनांक |
|---|---|---|
| ०१ | शासकीय तंत्रनिकेतन,पुणे | ०९/१०/२०१९ |
| ०२ | महाराष्ट्र राज्य हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिग टेक्नोलॉजी,पुणे | |
| ०३ | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,कराड (पदविका) | |
| ०४ | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय,पुणे | |
| ०५ | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन,तासगांव | |
| ०६ | शासकीय तंत्रनिकेतन,अवसरी | १०/१०/२०१९ |
| ०७ | शासकीय तंत्रनिकेतन,मिरज | |
| ०८ | शासकीय तंत्रनिकेतन,कराड | |
| ०९ | शासकीय तंत्रनिकेतन,कोल्हापूर | ११/१०/२०१९ |
| १० | शासकीय तंत्रनिकेतन,सोलापूर | |
| ११ | सर्व अनुदानित पदविका संस्था | १४/१०/२०१९ |

(डॉ.डी.आर.नंदनवार)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

प्रत- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांना माहितीसाठी सादर.

प्रत- संगणक विभाग,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी